**व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र (CGCC), कौशल्य प्रशिक्षण संस्था (Skill Training Providers) व मूल्यमापन संस्था (Assessing Bodies) यांना सूचिबध्द करण्याबाबतचे निकष निश्चित करणे.**

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : कौविउ-२०१५/प्र.क्र.३७/अभि-१**
२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २३ नोव्हेंबर,२०१५.

**वाचा:** १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.कौविका-२०१०/(१७७/२०१०)/व्यशि-५, दि. २९.१२.२०१०
२) शासन निर्णय , उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. कौविका२०१०/(१७०/२०१०)/ व्यशि-५,दि. २८.२.२०११
३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. कौविका-२०१०/(११९/१०)/व्यशि-५, दि. २१.५.२०११
४) शासन निर्णय क्र, सामान्य प्रशासन विभाग, एईओ-१०१५/प्र.क्र.०६/२०१५, दि. १५.१.२०१५
५) शासन निर्णय, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, क्र.कौविउ-२०१५/ प्र.क्र.२१/प्रशा-१, दि. ६.४.२०१५
६) शासन निर्णय ,कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, क्र. कौविउ-२०१५/प्र.क्र. १९५/रोस्वरो-१, दिनांक ३.८.२०१५.
७) शासन निर्णय, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, क्र.कौविउ-२०१५/प्र.क्र.१२२/ रोस्वरो-१, दि. २.९.२०१५

**पार्श्वभूमी :**

सन २०१४ पासून मा.पंतप्रधान यांच्या "मेक इन इंडिया" या संकल्पनेस अनुसरुन "स्कील इंडिया" या नावाने कौशल्य विकास या कार्यक्रमास केंद्र शासनाने सर्वोच्च प्राधान्य दिले असून या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय स्तरावर "कौशल्य विकास व उद्योजकता" या स्वतंत्र मंत्रालयाची स्थापना केली आहे. या अनुषंगाने तसेच मा.मुख्यमंत्री यांच्या मेक इन महाराष्ट्र या ध्येयास अनुसरुन राज्यात कौशल्य विकास अभियान अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी संदर्भाधीन दिनांक १५.१.२०१५ च्या शासन निर्णयान्वये पूर्वीच्या रोजगार व स्वंयरोजगार विभागाचे रुपांतर करुन "कौशल्य विकास व उद्योजकता विभाग" या स्वतंत्र विभागाची स्थापना करण्यात आली आहे.

राज्यातील मनुष्यबळाचे कौशल्य विकसीत करून त्यांना मागणी असलेल्या क्षेत्रात रोजगार/स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्धतेद्वारे परिवार व समाजाचा एक उत्पादक सदस्य म्हणून सन्मानाने आपले भावी आयुष्य समर्थपणे घडविता यावे. तसेच विविध विभागामार्फत राबविण्यांत येणाऱ्या योजनांचे एकात्मिकरीत्या नियोजन व अंमलबजावणीतून " मेक इन इंडीया " व " मेक इन महाराष्ट्र" या सारख्या संकल्पना साकार करून राज्याच्या अर्थव्यवस्थेचे बळकटीकरण करता यावे

यासाठी कौशल्य विकासासंबंधीचे सर्वसमावेशक "प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता अभियान" संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक ०२ सप्टेंबर, २०१५ अन्वये राज्यात सुरू करण्यात आले आहे.

कौशल्य विकास कार्यक्रमाचे घटक असलेल्या कौशल्य प्रशिक्षण संस्था, व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन संस्था व मूल्यमापन संस्था यांना सूचिबध्द करण्याबाबतचे निकष दिनांक ०२ सप्टेंबर, २०१५ च्या शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आलेले नसल्याने राज्यात सदर अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी उपरोक्त संस्थांच्या निवडीबाबतचे निकष निश्चित करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन निर्णय :**

प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र (CGCC), कौशल्य प्रशिक्षण संस्था व मूल्यमापन संस्था (Assessing Bodies) यांना खालील निकषानुसार सूचीबद्ध करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. **व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र** (CGCC) -

उमेदवारांची नोंदणी, कौशल्यपूर्व मुल्यमापन चाचणी घेणे, उमेदवारांचा कल, आवड व क्षमता विचारात घेवुन त्यांना उद्योगांच्या/बाजारपेठेतील मागणीनुसार कौशल्यआधारीत प्रशिक्षणासाठी शिफारस करण्यासाठी व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्रांची स्थापना करण्यास शासन निर्णय दिनांक ०२ सप्टेंबर, २०१५ अन्वये मान्यता देण्यांत आलेली आहे. या प्रकारची केंद्रे शासनाच्या अथवा स्वत:च्या जागेत किंवा फिरत्या स्वरूपात कार्यान्वित करण्यासाठी व्यवसायिक तज्ञ/संस्था सूचिबध्द करण्यांत येतील यासाठी पुढील प्रमुख निकषांच्या आधारे स्पर्धेद्वारे संस्थांना व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र म्हणून सूचीबद्ध करण्याची कार्यवाही महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्थेमार्फत करण्यात येईल.

१.१. कौशल्यपूर्व मुल्यमापन व समुपदेशन/शिक्षण/व्यवसाय शिक्षण/व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन/ प्रशिक्षण या उद्देशाकरीता कायदेशीर नोंदणीकृत करण्यांत आलेल्या अशासकीय अथवा शासकीय संस्था/विश्वस्त संस्था/मर्यादित कारणास्तव भागिदारीतील संस्था/भागिदारीतील संस्था/एकमेव मालकी असलेली संस्था/सोसायटी असणे आवश्यक.

१.२. संस्था ही किमान तीन वर्षे या क्षेत्रात काम करणारी असावी.

१.३. संस्थेचे मागील तीन वर्षात किमान सरासरी रूपये २५.०० लाखाची उलाढाल असणे आवश्यक.

१.४. संस्थेने मागील तीन वर्षात किमान ३००० लाभार्थ्यांचे व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केलेले असावे.

१.५. रोजगाराचे मुल्यमापन, व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशनासाठी संस्थेकडे प्रति केंद्र किमान ०५ प्रशिक्षित व्यक्ति/सल्लागार असणे तसेच व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशनासाठी तांत्रिक व आर्थिक सक्षमता असणे आवश्यक आहे.

१.६. राज्य किंवा केंद्र शासनाने संस्थेस काळया यादीत टाकलेले नसावे.

१.७. संस्थेकडे वैध PAN व TAN प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

**२. कौशल्य प्रशिक्षण संस्था** (Skill Training Providers STPs) -

बाजारपेठेतील मागणीनुसार सुसंगत प्रशिक्षण कार्यपध्दती राबवून NCVT,SCVT,SSCs, MSSDS इत्यादींमार्फत मान्यताप्राप्त तसेच NSQF शी सुसंगत अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी खालील निकषांची पुर्तता करणाऱ्या कौशल्य प्रशिक्षण संस्थांना महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्थेमार्फत सूचिबध्द करण्यांत येईल.

**२.१. खालील प्रवर्गात मोडणाऱ्या संस्थांना कौशल्य प्रशिक्षण संस्था म्हणून सूचिबध्द करण्यांत येईल.**

**अ) शैक्षणिक/प्रशिक्षण संस्था.**

- राष्ट्रिय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) संलग्नीत शासकीय व अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था.
- केंद्रीय मंत्रालयाच्या अखत्यारीतील परिषदांनी मान्यता दिलेल्या संस्था उदा. अखिल भारतीय तांत्रिक परिषद (AICTE)/भारतीय वैद्यकीय परिषद/नर्सिंग परिषद/नॅशनल काउन्सिल फॉर हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरींग टेक्नॉलॉजी/इतर
- केंद्र/राज्य शासन/केंद्रशासित प्रशासनाने स्थापित केलेल्या विद्यापीठाशी संलग्न असलेल्या संस्था.
- केंद्र/राज्य शासनाच्या माध्यमिक/उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ व तंत्र शिक्षण मंडळ/महाराष्ट्र राज्य व्यवसाय परिक्षा मंडळाने मान्यता दिलेल्या संस्था.
- दुरस्थ शिक्षण परिषदेने मान्यता दिलेल्या दुरस्थ शिक्षण संस्था.
- आंतरराष्ट्रिय हवाई वाहतूक संघटना (IATA) किंवा आंतरारष्ट्रिय विमान चालन संस्था (ICAO) यांनी मान्यता दिलेल्या संस्था.
- शिकाऊ उमेदवारी कायदा, १९६१ अंतर्गत प्रशिक्षण देणाऱ्या संस्था.
- NSDC, SSCs व SCVT इत्यादीं यांचेकडे सूचिबध्द असलेल्या संस्था.
- आंतरराष्ट्रिय स्तरावरील प्रमाणन करणारी व आंतरराष्ट्रिय स्तरावर रोजगाराकरीता स्विकाहार्य असलेल्या संस्थेचे मान्यता प्राप्त प्रशिक्षण कार्यक्रम राबविणाऱ्या प्रशिक्षण संस्था.

**ब) शासनाने स्थपित केलेल्या संस्था.**

केंद्र/राज्य शासन/केंद्रशासित प्रशासनाने स्थापित केलेल्या (स्वायत्त संस्थांसह) संस्था.

**क)** स्थानिक प्राधिकरणाकडे नोंदणीकृत असलेल्या व संबंधित क्षेत्रात किमान ०३ वर्षे कार्यरत असलेल्या आवश्यक पायाभूत सुविधा, यंत्रसामग्री व साधनसामग्री व आवश्यक प्रशिक्षण सुविधा असलेल्या आणि मनुष्यबळ, एकाच वेळेस किमान एका तुकडीचे प्रशिक्षण करण्याची प्रशिक्षण क्षमता असलेल्या प्राधिकरणाकडे नोंदणीकृत असलेल्या इस्पितळे, नर्सिंग होम यांसह कोणत्याही औद्योगिक आस्थापना.

**ड)** एकाच वेळेस किमान एका तुकडीचे प्रशिक्षण करण्या इतक्या पायाभूत/प्रशिक्षण सुविधा व अर्हताधारी मनुष्यबळ असलेल्या चेंबर ऑफ कॉमर्स ऑफ इंडस्ट्रिज (CII) किंवा औद्योगिक संघटना.

ई) व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम/रोजगाराक्षम कौशल्य प्रशिक्षण उद्योजकता विकास प्रशिक्षण इत्यादीं क्षेत्रातील कायदेशिर नोंदणीकृत उद्योग/व्यापारी मंडळ/विश्वस्त संस्था/मर्यादित कारणास्तव भागिदारीतील/भागिदारीतील/एकमेव मालकी असलेल्या संस्था.

वर नमूद अ, क व ड प्रवर्गातील अशासकीय संस्था हया कौशल्य प्रशिक्षण संस्था म्हणून सुचिबध्द होण्यासाठी संस्था कायदेशिर नोंदणीकृत उद्योग/व्यापारी मंडळ/विश्वस्त संस्था/मर्यादित कारणास्तव भागिदारीतील/ भागिदारीतील एकमेव मालकी असलेल्या/सोसायटी असणे आवश्यक आहे.

२.२. संस्थेकडे वार्षिक किमान १०० प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा/पुरेसे मनुष्यबळ यांची तांत्रिक व आर्थिक सक्षमता असणे आवश्यक आहे.

२.३. राज्य किंवा केंद्र शासनाने संस्थेस काळया यादीत टाकलेले नसावे.

वरील संस्थांपैकी ज्या संस्था केंद्र व राज्य शासनाच्या प्रशिक्षण संस्था अथवा राष्ट्रिय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT)/सेक्टर स्किल कौन्सिल (SSC)/नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (NSDC)/राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद (SCVT) इत्यादीं विभाग/संस्था/प्राधिकरण यांचेकडे सूचिबध्द झालेल्या आहेत अशा संस्थांना महाकौशल्य पोर्टलद्वारे सूचिबध्द करून घेण्यांत येईल. तथापी, याप्रकारे सूचिबध्द झालेल्या संस्थांव्यतिरिक्त ज्या संस्थांकडे केंद्र व राज्य शासनाचे विभाग अथवा राष्ट्रिय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT)/सेक्टर स्किल कौन्सिल (SSC)/नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (NSDC)/राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद (SCVT)/महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था (MSSDS) इत्यादींनी मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमांसाठी विहित केलेल्या

मानकांनुसार प्रशिक्षित मनुष्यबळ, जागा, यंत्रसामग्री, कच्चा माल, इत्यादीं सुविधा उपलब्ध आहेत अशा संस्थांच्या महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्थेने प्राधिकृत केलेल्या तज्ञ/संस्थाकडून प्राप्त निरिक्षण अहवालाच्या आधारे संस्थांना महाकौशल्य पोर्टलवर सूचिबध्द करून घेण्यात येईल.

शासनाने वेळोवेळी निश्चित केल्याप्रमाणे निधीच्या उपलब्धतेनुसार सूचिबध्द कौशल्य प्रशिक्षण संस्थांकडून प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करून घेण्यात येतील. तथापी, सूचिबध्द कौशल्य प्रशिक्षण संस्थेस शासन पुरस्कृत प्रशिक्षणाचे कार्यक्रम उपलब्ध करून देणे बंधनकारक नाही. परिस्थितीनुसार आवश्यक असेल तेथे शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अटीं व शर्तीं मान्य केलेल्या सूचिबध्द कौशल्य प्रशिक्षण संस्थांना खालील प्राधान्य क्रमाने प्रशिक्षण कार्यक्रम वितरीत करण्यांत येतील.

अ) प्रशिक्षण देण्यांत आलेल्या जिल्हयामध्येच सर्वाधिक रोजगार (Wage Employment) देणाऱ्या कौशल्य प्रशिक्षण संस्था.

आ) प्रशिक्षण यशस्वीपणे पुर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना सर्वाधिक रोजगार मिळवून देणाऱ्या कौशल्य प्रशिक्षण संस्था.

इ) प्रशिक्षण यशस्वीपणे पुर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना सर्वाधिक सरासरी वेतनावर रोजगार (Wage Employment) मिळवून देणाऱ्या संस्था.

ई) मागील तीन वर्षामध्ये सर्वाधिक प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देवून रोजगार उपलब्ध करून दिलेली संस्था.

३. **मुल्यमापन संस्था/व्यक्ति** (Assessing Bodies) :

विविध प्रशिक्षण संस्थांमार्फत प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्रयस्थ संस्थेमार्फत प्रशिक्षित लाभार्थ्यांचे मुल्यमापन होवून, यशस्वी लाभार्थ्यांचे प्रमाणिकरण करणे आवश्यक आहे. या प्रक्रियेसाठी तज्ञ मुल्यमापन संस्था/व्यक्तीची आवश्यकता आहे. ही बाब लक्षात घेता खालील निकष पूर्ण करणाऱ्या मुल्यमापन संस्थां/व्यक्तींना (Assessing Bodies) महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्थेमार्फत सूचिबध्द करण्यांत येईल.

३.१. केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांच्या अंतर्गत राबविण्यांत येत असलेल्या कौशल्य विकासाच्या योजनांसाठी NSDC/NCVT/SSCs/SCVT इत्यादीं संस्थांनी सूचिबध्द करण्यांत आलेल्या संस्था/व्यक्ती अशा संस्थां/व्यक्तींना महाकौशल्य पोर्टलद्वारे सूचिबध्द करून घेण्यांत येईल.

३.२. वरील परिच्छेद ३.१ मधील संस्था/व्यक्ती व्यतिरिक्त केंद्र व राज्य शासनाचे विभाग अथवा NCVT/SSCs/NSDC/SCVT इत्यादींनी निश्चित केलेले निकष पुर्ण करणाऱ्या संस्थां/व्यक्तींच्या पात्रतेचे मुल्यमापन महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्थेमार्फत करण्यांत येवून, मुल्यमापन अहवालाच्या आधारे त्यांना महाकौशल्य पोर्टलवर सूचिबध्द करून घेण्यांत येईल.

वरीलप्रमाणे विविध व्यक्ती/संस्थांसाठी विहित केलेल्या प्रमुख निकषांचा सविस्तर तपशिल व अनुषंगिक बाबी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्थेने निश्चित करून संस्था/व्यक्तींच्या सूचिबध्दतेची कार्यवाही करण्यांत यावी. याप्रमाणे महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्थेने यापूर्वी केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यांत येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५११२४१२२९३८०९०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santokh Singh Sandhu

Digitally signed by Santokh Singh Sandhu
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Principal Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Santokh Singh Sandhu
Date: 2015.11.24 12:32:54 +05'30'

**(एस. एस. संधू)**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत :**

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
२. सर्व संबंधित मा.मंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. सर्व संबंधित मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई,
५. सर्व विधानमंडळ सदस्य,महाराष्ट्र राज्य,
६. मा.मुख्य सचिव, मंत्रालय , मुंबई,
७. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई,
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था, कफ परेड, मुंबई,
१०. आयुक्त तथा संचालक नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई,
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१३. महालेखापाल (लेखा परीक्षा) -१, महाराष्ट्र, मुंबई,
१४. महालेखापाल (लेखा परिक्षा) -२, महाराष्ट्र, नागपूर,
१५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१६. निवासी व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१७. सर्व विभागीय आयुक्त,
१८. सर्व जिल्हाधिकारी,
१९. आयुक्त सर्व महानगरपालिका
२०. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२१. मुख्याधिकारी, सर्व नगर परिषद/नगर पंचायती,
२२. संचालक (प्रशिक्षण/व्यवसाय शिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य ,मुंबई

२३. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नागपूर/ अमरावती/औरंगाबाद/ नाशिक,

२४. उपसंचालक, विभागीय मुख्यालय कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मुंबई/पुणे/नागपूर/ अमरावती/औरंगाबाद /नाशिक,

२५. सर्व कार्यासने, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई,

२६. निवड नस्ती